# ऋणनिर्देश

"जालना जिल्ह्यातील कृषिवर आधारित उद्योंगाचा भौगोलिक अभ्यास" या विषयावर पीएच.डी. पदवीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद अंतर्गत भूगोल विषयामध्ये संशोधन प्रबंध सादर करतांना मला मनस्वी आनंद होत आहे. या प्रबंधाचे कार्य करत असताना माझे गुरूवर्य व मार्गदर्शक डॉ. पाथरे यु.बी. यांनी अतिशय मौलिक व आत्मियतेने मार्गदर्शन केले. प्रस्तुत संशोधनात माझे मार्गदर्शक म्हणून त्यांची भूमिका ही केवळ एका मार्गदर्शकाची नव्हती तर एका प्रेमळ गुरूची होती. माझ्या दृष्टीने त्यांचे हे वेगळेपण केवळ ऋण व्यक्त करण्यापुरतेच मर्यादित असू शकत नाही म्हणून त्यांच्या ऋणातच राहणे योग्य ठरेल.

ज्या शिक्षण संस्थेने मला सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्या भगवान शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मा.आ.डॉ.नारायणराव मुंढे, सचिव प्रा. सत्संग मुंढे, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुनंदा तिडके यांचे मी आभार मानतो.

राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या भूगोल विभागाचे प्रमुख प्रा.बी.डी. वाघ, डॉ.ढोकणे पी.के., डॉ.खाडे एस.एस., प्रा. विजय तिडके या सर्वांनी संशोधक काळात मला वेळोवेळी सहकार्य व प्रोत्साहन दिल्याबद्दल मी त्यांचा आभार आहे.

संशोधन कालावधीत मला ज्यांची सतत मदत व प्रेरणा मिळाली ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या भूगोल विभागाचे प्रमुख डॉ.मदन सुर्यवंशी यांचेही मी आभार मानतो. याशिवाय डॉ.बळीराम लहाने, डॉ.दादासाहेब गजहंस, डॉ. संजय पाटील, प्रा. विजयकुमार वाघमारे, डॉ.विजय राजाळे, डॉ.सर्जेराव ताठे, डॉ.सी.यु.भोरे, डॉ.विश्वास शिंदे, प्रा.रामदास खांडेभराड, डॉ.दिलीप फोके, डॉ.तुकाराम गजर, डॉ. संदीप सावंत, तसेच श्री.पुंड एन.एस. (सेवानिवृत्त कृषी अधिकारी, जालना), श्री.गिरी सर (कृषी विभाग,जालना) यांचे वेळोवेळी मिळालेले सहकार्य व प्रोत्साहनामुळे माझ्या संशोधन कार्याला गती मिळाली.

आमच्या महाविद्यालयातील सहकारी डॉ.नवनाथ शिंदे, प्रा.विठ्ठल गाडेकर, प्रा.गोवर्धन खेडकर,डॉ.उमेश मुंढे, डॉ.सोपान चव्हाण, प्रा.रामनाथ पालवे, प्रा. लहु दरगुडे व इतर सर्व स्नेही प्राध्यापक तसेच ग्रंथपाल प्रा.डॉ.विक्रम दहिफळे, श्री.भास्कर शिंदे (कार्यालय अधिक्षक), श्री.अर्जुन भाबड, श्री.बापुसाहेब आंधळे, श्री. भगवान भिंगारे, श्री. संतोष साबळे, श्री. धनंजय वाघ, श्री.अनिकेत मुंढे,श्री. ईश्वर शिंदे यांच्या सहकार्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

कठोर परिश्रमाशिवाय काहीही साध्य होऊ शकत नाही, अशी शिकवण देणार माझे वडिल कै. नारायण देवबा केंदळे व आई श्रीमती व्दारकाबाई नारायणराव केंदळे यांचे ऋण शब्दातीत आहे. माझ्या कुटूंबातील माझे बंधु व वहिणी सौ.अनुप्रिता संजय केंदळे, सौ.मंजुषा अनिल केंदळे व सौ.श्वेता सुनिल केंदळे यांच्या भरीव सहकार्यामुळे मला हे संशोधन पूर्णत्वास नेता आले. माझी पत्नी सौ.अर्चना विजय केंदळे, चि.पलाश व आदित्य यांच्या सहकार्याने व प्रेमामुळे मी हे संशोधन कार्य पूर्णत्वास नेऊ शकलो.

याशिवाय ज्यांच्याकडून मला प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष मदत व सहकार्य मिळाले त्या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार व ऋणनिर्देश पूर्ण करतो.

**केंदळे विजय नारायणराव**
संशोधक